वर्ग : टी.वाय.बी.कॉम

विषय : भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास

प्रकरण नं ०३ : १९९१ पासूनचा भारतातील औद्योगीक विकास

---

**औदयोगिकीकरण: (Industrialisation)**

"औदयोगिकीकरण ही भांडवलाच्या गहणीकरणाची त्याचप्रमाणे भांडवलाच्या विस्तारीकरणाची प्रक्रिया होय". भांडवलाचे गहणीकरण म्हणजे उत्पादनाच्या प्रत्येक नगासाठी भांडवलाचा जास्तीत जास्त वापर करणे.भांडवलाचे विस्तारीकरण म्हणजे अंतिम वस्तूच्या उत्पादनाच्या वाढीबरोबर भांडवल निर्मितीमध्ये वाढ करणे.

**आर्थिक विकासातील औदयोकीकरणाची भूमिका / महत्व :**

आर्थिक विकासातील औदयोकीकरणाची भूमिका / महत्व पुढीलप्रमाणे:

१. दरडोई उत्पन्नात जलद गतीने वाढ

२. रोजगार संधीत वाढ

३. वाढत्या मागणीची पूर्तता

४. उत्पादनाचे विविधिकरण

५. जीवनमानात सुधारणा

६. बचत व गुंतवणुकीत वाढ

७. अर्थव्यवस्था बळकट होते

८. प्राथमिक व्यावसायांचा विकास

९. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ

१०. अर्थव्यवस्थेचे सामर्थ्य वाढते

११. सामाजिक बदल

१२. सरकारची लोककल्याणाची कार्ये

**लघु उद्योग (Small Scale Industries) :**

लघु उद्योगाची अर्थव्यवस्थेतील भूमिका पुढीलप्रमाणे:

१. रोजगार निर्मिती

२. अल्प भांडवल

३. त्वरित उत्पादन

४. विकेन्द्रित स्वरूप

५. स्थानिक साधन संपत्तीचा उपयोग

६. अल्प कौशल्य

७. उत्पन्न व संपत्तीचे योग्य वाटप

८. आर्थिक स्थैर्य

९. भांडवल निर्मितीस प्रोत्साहन

१०. प्रदूषण होत नाही

११. शेतीवरील अवलंबन कमी होते

१२. मोठ्या उद्योगांना आधार

१३. जीवनोपयोगी वस्तूंचे उत्पादन

**लघु उदयोगांच्या समस्या आणि भवितव्य :**

**लघु उदयोगांच्या समस्या:**

१. भांडवल टंचाई

२. कच्च्या मालाची टंचाई

३. पारंपारिक उत्पादन तंत्र

४. विक्रीची समस्या

५. प्रशिक्षण व संशोधनाची समस्या

६. वीज टंचाई

७. स्पर्धा

८. उत्पादन खर्च जास्त

**लघु उदयोगांचे भवितव्य:**

* लघु उद्योगांच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासनाने अनेक संस्थांची स्थापना केली.
* लघु उद्योगांना बीज भांडवल व कमी व्याजदराने कर्ज
* सरकारी खरेदीत अग्रक्रम
* कुटीर व ग्रामोद्योगांना चालना देण्यासाठी खादी व ग्रामोद्योगांची स्थापना
* लघु उद्योगातील उत्पादनांना विदेशात प्रचंड मागणी उदा.काश्मीरचे गालिचे, अलीगडचे कुलूप येवल्याची पैठणी इ.

**मध्यम व मोठे उद्योग : ( Medium & Large Scale Industries) :**

मध्यम व मोठ्या उदयोगांची अर्थव्यवस्थेतील भूमिका पुढीलप्रमाणे:

१. औद्योगिकीकरणाचा पाया

२. आधुनिक तंत्राचा वापर

३. पायाभूत सुविधांचा विकास

४. निर्यातीत वाढ

५. रोजगार निर्मिती

६. कामगार कल्याण

७. गाभा क्षेत्राचा विकास

८. आयात पर्यायीकरण

९. लघु उदयोगांना सहाय्य

१०. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ

११. कर उत्पन्नात वाढ

१२. शेतीवरील भार कमी होतो

१३. बाजारपेठेचा विकास

**मध्यम व मोठ्या उदयोगांच्या समस्या :**

मध्यम व मोठ्या उदयोगांच्या समस्या पुढीलप्रमाणे :

१. जादा उत्पादन खर्च

२. उत्पादन क्षमतेचा अपूर्ण वापर

३. जुने उत्पादन तंत्र

४. अधिक किंमती

५. वाढती स्पर्धा

६. किंमत निर्धारण समस्या

७. कच्च्या मालाची समस्या

८. अत्याधिक करांचा भार

९. मोठी गुंतवणूक

१०. पायाभूत सोईवर मोठा खर्च

११. कर्जाचे मोठे प्रमाण

**१९९१ चे औद्योगिक धोरण : (New Industrial Policy)**

औद्योगिक धोरण म्हणजे देशाच्या औद्योगिकरणाचा सिद्धांत, उद्योगाचे व्यवस्थापन, औद्योगिकरणाची पद्धती तसेच वेग याबाबत सरकारचा द्रुष्टिकोन स्पष्ट करणारी अधिकृत घोषणा होय.

२४ जुलै १९९१ रोजी नवीन आर्थिक धोरण जाहीर करण्यात आले. या आर्थिक धोरणाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे:-

१. औद्योगिक परवाना पद्धती शिथिल करणे.

२. भारतीय उद्योगांना जागतिक प्रवाहात आणणे.

३. मक्तेदारी कायदा शिथिल करून स्पर्धेचे वातावरण तयार करणे.

४. भारतीय अर्थव्यवस्थेला नोकर शाहीच्या अनावश्यक जोखडातून मुक्त करणे.

५. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीवरील निर्बंध कमी करणे.

६. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची व्याप्ती कमी करणे.

७. जागतिक अर्थव्यवस्थेचा भाग म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास करणे.

८. आयात मूल्य देण्यासाठी निर्यात वाढ घडवून आणणे.

९. सार्वजनिक उद्योगात व्यापारी तत्वाचा स्वीकार करणे.

१०. देशाला आत्मनिर्भर बनविणे.

**१९९१ च्या औद्योगिक धोरणाचे मूल्यमापन :**

**अ) यश किंवा फायदे :**

१. परवाना पद्धती रद्द करण्याची उद्योगांची मागणी पूर्ण झाली.

२. MRTP कायद्यातील सुधारणा मुळे उदयोगांच्या विकासाला चालना मिळाली.

३. नोकरशाही व राजकारणी यांच्याकडून औद्योगिक प्रगतीमध्ये होणारे अडथळे कमी झाले.

४. कंपन्यांचे एकत्रीकरण, ताब्यात घेणे, विलीनीकरण याबाबत उदयोगांना पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त झाले.

५. कंपन्यांचे विविधिकरण, विस्तार आणि आधुनिकीकरण यासाठी भांडवल उभारणी करणे शक्य झाले.

६. सार्वजनिक क्षेत्रातील खाजगी सहभागामुळे स्पर्धा आणि व्यवसायभिमुखता वाढण्यास मदत झाली.

**ब) दोष किंवा अपयश :**

१. विदेशी भांडवलाचा वाढता धोका

२. मक्तेदारी वाढण्याचा धोका

३. प्रादेशिक विषमता

४. लघु उद्योगांना मारक

५. बेकारीत वाढ होण्याची शक्यता

६. सार्वजनिक क्षेत्राबाबत टीका

७. अस्थिरता

८. कमी महत्वाच्या वस्तूंचे उत्पादन

९. अवास्तव अवलंबनाचा धोका

१०. मक्तेदारी कायद्यातील सुधारणामुळे संपत्तीचे केंद्रीकरण वाढेल

११. उत्पादनावरील नियंत्रण कमी होईल.